**महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-'मित्र' (Maharashtra Institution for Transformation-'MITRA')या संस्थेच्या पदभरतीकरिता निवड समिती स्थापन करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्र.नीतिआ-२०२३/प्र.क्र.०३/का-१४४४-अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२
दिनांक : २० जून, २०२३

वाचा : १. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. नीतिआ-२०२२/प्र.क्र.३७(भाग-१)/का-१४१२, दिनांक ११.११.२०२२
२. नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. नीतिआ-२०२२/प्र.क्र.१०/का-१४२६, दिनांक २३.०२.२०२३

**प्रस्तावना :**

नीति आयोगाच्या धर्तीवर राज्यात महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन- 'मित्र' (Maharashtra Institution for Transformation- 'MITRA') या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. उपरोक्त वाचा क्रमांक २ अन्वये कार्यकारी मंडळातील मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन- 'मित्र' यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

'मित्र'च्या कामकाजासाठी लागणाऱ्या मनुष्यबळाची भरती प्रक्रिया नीति आयोगाने विहित केलेल्या मार्गदर्शक सुचनांच्या धर्तीवर करण्याबाबत मंत्रिमंडळाच्या दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे व उपरोक्त वाचा क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये पदभरतीस मान्यता देण्यात आली आहे. सदर पदभरती करताना निवड समिती नेमण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन- 'मित्र' (Maharashtra Institution for Transformation- 'MITRA') च्या कामकाजासाठी बाह्यस्त्रोताद्वारे नियुक्त करावयाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्या निवडीकरिता खालीलप्रमाणे निवड समिती स्थापन करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | पदाधिकारी / अधिकाऱ्याचे पदनाम | धारण केलेले पद |
|---|---|---|
| १ | मुख्य कार्यकारी अधिकारी, 'मित्र' | अध्यक्ष |
| २ | अ.मु .स./प्र.स.(नियोजन)/अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३ | के. राधा, भाप्रसे, अपर सचिव (दिल्ली -नीति आयोग)/अथवा त्यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४ | सहसचिव/उपसचिव (आदिवासी विकास विभाग) | सदस्य |
| ५ | सहसचिव/उपसचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) | सदस्य |

**समितीची कार्यकक्षा** :

महाराष्ट्र इन्स्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन- 'मित्र' (Maharashtra Institution for Transformation-' MITRA') च्या कामकाजासाठी बाह्यस्त्रोताद्वारे अधिकारी/कर्मचारी यांची निवड करणे व पदभरती संदर्भात योग्य ते निर्णय घेणे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(चित्रकला सुर्यवंशी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति.

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) विभाग यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इन्स्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन- 'मित्र', मुंबई.
५. व्ही. राधा, भा.प्र.से. अपर सचिव, नीति आयोग, दिल्ली.
६. प्रधान सचिव, नियोजन विभाग यांचे स्वीय सहायक,
७. सह सचिव (का-१४४-अ), नियोजन विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
८. सह सचिव /उप सचिव, आदिवासी विकास विभाग, यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई,
९. सह सचिव /उप सचिव /सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१०. सह सचिव /उप सचिव /अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. निवडनस्ती, कार्यासन-१४४-अ, नियोजन विभाग,